## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त अमळनेरात आज भव्य शोभायात्रा

**अमळनेर । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त अमळनेर येथील सकल धनगर समाजातर्फे आज दि.३१ मे रोजी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

सदर शोभायात्रा आज दि.३१ रोजी दुपारी ४ वाजता चोपडा नाका येथून निघून रात्री ८ वाजता बस स्थानक चौकातील अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकावर पोहोचणार आहे.याठिकाणी माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील हे उपस्थितांना संबोधित करतील यानंतर अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण होऊन सामूहिक अभिवादन केले जाणार आहे. तरी सर्व धनगर व इतर समाज बांधवांनी यावेळी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन सकल धनगर समाज, अमळनेर तर्फे करण्यात आले आहे.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम

**रावेर । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त रावेर येथे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी सकाळी रावेर शहरात भाजप जेष्ठ नेते सुरेश धनके यांच्या नेतृत्वात व राजन लासुरकर, संदिप सावळे, जयेश कुयटे, लखन सावळे, अ‍ॅड.प्रविण पाचपोहे, हिलाल सोनवणे, विश्वजित सावळे, स्वप्निल लासुरकर, निलेश सावळे, शुभम नमायते यांच्या उपस्थितीत सकाळी ९ वा. ग्रामीण रुग्णालय स्टेशन रोड येथून मोटारसायकल रॅली निघणार आहे.

या रॅलीत तालूका भरातील धनगर समाज बांधव व समाजातील तरुण मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. तसेच भारतीय जनता पार्टी रावेर तालुका तर्फे स्वामी समर्थ केंद्र रावेर येथे सकाळी ११ वा.निबंध स्पर्धा आयोजीत केली आहे व दि.२८ रोजी झालेल्या रांगोळी स्पर्धेचे बक्षिस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी समाजबांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अधिकाऱ्यांनी नागरिकांची अडवणूक करु नये-आ.मंगेश चव्हाण

**चाळीसगाव । प्रतिनिधी**

शासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचा फायदा चाळीसगाव तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या नागरिकांच्या सर्व अडचणींचे निराकरण करावे, नागरिकांची अडवणूक होऊ नये यासाठी सतत प्रयत्नशील रहावे अशी सूचना यावेळी आमदार मंगेश चव्हाण यांनी केली.

तालुका छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर योजना महसूल मंडळ-मेहुणबारे येथील साई संकेत मंगल कार्यालयात दि.३० मे २०२५ रोजी महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार मंगेश रमेश चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात सर्व विभागांच्या एकूण ७५२ लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे, लाभांचे वितरण करण्यात आले.




पुढे बोलतालंना आ.मंगेश चव्हाण म्हणाले की, शासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचा फायदा चाळीसगाव तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या नागरिकांच्या सर्व अडचणींचे निराकरण करावे, नागरिकांची अडवणूक होऊ नये यासाठी सतत प्रयत्नशील रहावे अशी सूचना केली. यावेळी प्रांताधिकारी प्रमोद हिले, तहसीलदार प्रशांत पाटील, गटविकास अधिकारी श्री शेख, तालुका कृषी अधिकारी अभिषेक लगड, सर्व नायब तहसीलदार, सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक उपस्थित होते. शिबिरात सर्व विभागांच्या एकूण ७५२ लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे, लाभांचे वितरण करण्यात आले. शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटप करण्यात आली. **या योजानाचा मिळाला लाभ-** कृषी विभाग-राज्य पुरस्कृत कृषी यांत्रीकीकरण योजनांतर्गत १ लक्ष अनुदान ०१ ट्रॅक्टर वाटप -नरेश रामराम साळुंखे, संजय गांधी योजना उ्दढ प्रक्रिया करणे लाभार्थी-१२३, आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतलेले लाभार्थी -२४१, तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचे मार्फत दिलेल्या सेवा-९७, पुरवठा शाखा -शिधापत्रिका लाभ-१०३, उत्पन्न दाखले-४४, जातीचे दाखले-२२, वय अधिवास व रहिवास दाखले-५४, ग्रामपंचायत विभाग जॉब कार्ड-१२, जननी सुरक्षा योजना लाभ-१३, लेक लाडकी योजना-०४, आयसीडीस योजना-०७, ग्रा प मार्फ़त वजनकाटा वाटप-०१, उपअधिक्षक भुमी अभिलेख मार्फत सनद वाटप-१३, बांधकाम कामगार साहीत्य वाटप-१७.

# कृषी उत्पन्न बाजार समितीने आपल्या उत्पन्नातून लोकोपयोगी कामे उभी करावी-ना.बाबासाहेब पाटील

**अमळनेर । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीने आपल्या उत्पन्नातून लोकोपयोगी कामे उभी करावी असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे विविध विकास कामांच्या पायाभरणी समारंभ प्रसंगी केले. प्रमुख अतिथी म्हणून आ.अनिल पाटील हे उपस्थित होते. याप्रसंगी बाजारसमितीच्या आवारात माझा शेतकरी माझा अभिमान शेतकरी प्रेरणास्थळाचे, भव्य गोडाऊन शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या जागेचे भूमिपूजन करण्यात आले.

शासनाने शेतकऱ्यांच्या विविध थकबाकी लवकर अदा केल्यास शेतकरी आनंदी होईल, अमळनेर बाजार समितीच्या विकासाच्या दृष्टीने विविध योजनांना प्राधान्याने पाठबळ द्यावे असे आवाहन आ.अनिल पाटील यांनी केले. प्रास्ताविकात सभापती अशोक पाटील यांनी अमळनेर बाजार समिती ही शेतकरी हिताचे निर्णय घेत व्यापारी ते हमाल मापाडी, गुमास्ता या सर्वांना सोबत घेऊन मार्गक्रमण करीत आहे असे सांगितले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जिल्ह्यात विभागात व




राज्यात झालेला नावलौकिकाबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पाटील यांचेसह संचालक मंडळाचा सत्कार केला. मान्यवर लोकप्रतिनिधी यांना बाजार समितीतर्फे महात्मा बळीराजा यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

सूत्रसंचालन अमळनेर अर्बन बँकेचे व्हाईस चेअरमन रणजित शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन संचालक हिरालाल पाटील यांनी केले. याप्रसंगी जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे चेअरमन संजय पवार, माजी जि प सदस्या सौ.जयश्री पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय नेमाडे, माजी जिल्हा बँक संचालिका तिलोत्तमा पाटील,सौ. रिता बाविस्कर, यांचेसह विभागीय निबंध संभाजी निकम, जिल्हा निबंधक गौतम बलसाने, ऑडिटर के डी पाटील आदींसह कृ.ऊ.बा. चे संचालक डॉ.अनिल शिंदे, डॉ.अशोक पाटील, समाधान धनगर, सौ.पुष्पा पाटील, सौ.सुषमा पाटील, भाईदास भील, प्रकाश अमृतकार, ऋषभ पारेख, गट सचिव संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील, सचिव डॉ. उन्मेष राठोड आदि उपस्थित होते. याप्रसंगी आदर्श सरपंच नरेंद्र पाटील व नितीन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. व्यापारी असोसिएशन, तसेच हमाल मापाडी संघटना, गटसचिव संघटनेतर्फे ना.बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करण्यात आला.




# वीरांगना पुण्यश्लोक अहिल्याबाई

कीर्ति नावाचं अन्न ग्रहण करून मृत माणसं जीवंत राहतात. अशाच एका तेजस्विनी तपस्विनीची ही अमर कहाणी.नगर जिल्ह्यात चौंडी नावाच्या गावी माणकोजी शिंदे ( धनगर) यांची कन्या आणि इंदूरचे सुभेदार मल्हारराव होळकर यांची सून अवघ्या भरत खंडात लोकोपयोगी कामे करून नाव लौकिक कमवून अजरामर होईल हे कुणाला स्वप्नातही वाटले नसेल.मालव प्रांतावर त्यांनी २९ वर्षे राज्य केले.

हिंदवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवरायांनी केली.पण हिंदू संस्कृतीची जोपासना अहिल्या बाईंनी केली. त्यांना प्रसिध्दीची हाव नव्हती. मल्हारराव होळकर यांच्या तालमीत तयार झालेली धर्म परायण अहिल्या कुशल रणरागिणी राज्यकर्ती ,राजयोगिनी, वीरांगना बनली. दुर्दैवाने अकाली वैधव्य आलं. सास-याच्या विनवणीने त्या सावरल्या. पती खंडेराव आणि पुत्र मालेरावांचं जाणं जिव्हारी लागलं. पण प्रजेची माता बनून जे जे करता येईल ते सर्व त्यांनी केलं. अनंत संकटांवर मात करत त्यांनी प्रजेचा अधःपात होऊ दिला नाही. पानिपतच्या युध्दात मृत पतींच्या विधवांना विणकाम शिकवून रोजगार उपलब्ध करून दिला. चोर, दरोडेखोरांचा बंदोबस्त केला. काहींना कसण्यासाठी जमिनी दिल्या. बांधावर , रस्त्यांच्या कडेला झाडे लावली. दिल्ली ते कलकत्ता हा रस्ता त्यांच्याच कारकिर्दीतला. १२ ज्योतिर्लिंगे, चारधामे, जुनी देवळे, मंदिरे यांचा जिर्णोध्दार केला. रस्ते,पूल, बंधारे, विहीरी नद्यांना घाट, पाट बांधले.धर्मशाळा, पाठशाळा, आरोग्यशाळा बांधल्या. त्यावर राजवैद्यांच्या नेमणूका केल्या. इंदूरची राजधानी महेश्वरला आणली, बाजारपेठा फुलू लागल्या. कलावंत, विद्वान, पंडितांना आश्रय दिला. देवळाच्या पूजा अर्चेसाठी मानधन व्यवस्या केली. ती प्रथा आजही सुरू आहे. बंडखोरांना जबर शिक्षा आणि यशवंताचा सन्मान केला. राघोबा दादा पेशवे, गंगाधर चंद्रचूड , चंद्रावत राजे यांना धारेवर धरलं महिलांची फौज तयार करून युध्दकलेचं शिक्षण दिलं आणि स्वतः रणी उतरल्या. महादेवाच्या त्या निःसीम उपासक. म्हणून अहिल्याबाईंच्या हाती सदैव महादेवाची पींड दिसते. धार्मिक असल्या तरी कुशल प्रशासक होत्या. अशा ह्या देवता तुल्य मातोश्री. आजही त्यांचे कार्य राजवाडे, मंदिरे, बारव, विहीरी,घाटू रूपाने जिवंत आहेत. नव्हे त्याच या वास्तू रूपाने जिवंत आहेत. म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक लोकमाता ही बिरूदावली लावली जाते. जुलमी अहमदशहा च्या जागी नगरला अहमदनगर हे नाव दिले यात सरकारचे औचित्य कौतुकपात्र आहे.

अहिल्या बाईच्या३०० व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम!

**प्रा. डॉ म.सी.हळपे.**

भुसावळ. मो.-०९३७३६२०६७७

























